आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२७ जून २०२४ - गुरुवार

ठळक बातम्या

- नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रालोआ सरकार आकांक्षा पूर्ण करेल असा विश्वास जनतेला वाटत असल्यानं मतदारांनी त्यांना पुन्हा निवडून दिल्यांचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला प्रारंभ
- राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल दोन्ही सभागृहात सादर/ देशात परकीय थेट गुंतवणूकीत महाराष्ट्र अग्रस्थानी तर दरडोई उत्पन्नात ६व्या क्रमांकावर.
- शेअर बाजारात दिवसाच्या सुरवातीलाच उत्साह, सेन्सेक्स प्रथमच ७९ हजाराच्या पार

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात अफगाणिस्तानवर ९ गडी राखून विजय मिळवत दक्षिण आफ्रिकेचा अंतिम फेरीत प्रवेश

**<><><><><>**

देशातल्या जनतेनं या सरकारला तिसऱ्यांदा निवडून दिलं आहे कारण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारच आपल्या आकांक्षा पूर्ण करेल, असा जनतेला विश्वास वाटतो, गेल्या दहा वर्षातल्या सेवा आणि सुशासनावर शिक्कामोर्तब झालं आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. अठराव्या लोकसभेच्या स्थापनेनंतर आज संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला त्या संबोधित करत होत्या. लोकसभेचं अधिवेशन सोमवारपासून सुरु झालं असून राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने राज्यसभेच्या अधिवेशनाला सुरुवात झाली. अठरावी लोकसभा ही अनेक बाबतीत ऐतिहासिक असल्याचं त्यांनी सांगितलं. नुकत्याच

झालेल्या लोकसभा निवडणुकीची जगभर चर्चा सुरु आहे, काश्मीरमधल्या यंदाच्या विक्रमी मतदानानं देशाच्या शत्रूंना सडेतोड उत्तर मिळालं असल्याचंही त्या म्हणाल्या.

भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे, आरोग्य, पोषण, हवामान बदल अशा अनेक आघाड्यांवर भारत जगाचं नेतृत्व करीत आहे, अनेक जागतिक समस्यांवर उत्तरं शोधत आहे , असं राष्ट्रपतींनी स्पष्ट केलं.

देशातले २५ कोटींहून अधिक नागरिक गरिबीतून बाहेर आले आहेत, ही समाधानाची बाब असल्याचं त्या म्हणाल्या. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक पैलूवर लक्ष दिलं जात आहे, देशात हरित रोजगार वाढवण्यावर भर दिला जात आहे, ईशान्य भारतात सर्व प्रकारची संपर्कव्यवस्था विकसित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, चार दशकांनंतर पहिल्यांदाच वन रँक वन पेन्शन योजना लागू झाली आहे, इत्यादी मुद्द्यांचा त्यांनी उहापोह केला. पेपरफुटी प्रकरणाची निःपक्षपाती चौकशी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेचं आजचं कामकाज तहकूब झालं. राज्यसभेचं कामकाज सुरु झाल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सभागृहाला नवीन मंत्र्यांची ओळख करून दिली. नंतर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आजपासून सुरू झालं. सभागृहात जाण्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहासमोरच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार,

विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.

सभागृहाच्या कामकाजापूर्वी विरोधी पक्ष सदस्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर निदर्शनं केली. शेतकऱ्यांची कर्जमाफी, वीजबिल माफी, नैसर्गिक आपत्तींचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना मदत इत्यादी मुद्द्यांवर  विरोधकांनी घोषणा दिल्या. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण, आमदार भाई जगताप, रवींद्र धंगेकर, अनिल देशमुख आणि इतरांनी विविध मुद्द्यांवरून सरकारचा निषेध केला.

राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या समस्यांशी काहीही देणंघेणं नाही, असा आरोप विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. विधानभवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

गेल्या आर्थिक वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेतली वाढ ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असा अंदाज आर्थिक पाहणी अहवालात वर्तवण्यात आला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्याच्या स्थूल उत्पन्नात ९ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची वाढ झाली होती. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज दोन्ही सभागृहांच्या पटलावर हा अहवाल मांडला. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ८ पूर्णांक ८ दशांश टक्के तर कृषी क्षेत्रात सर्वात कमी १ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ गेल्या आर्थिक वर्षात झाली. उद्योग क्षेत्राचा वाढीचा दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील असं पूर्वानुमान आहे.

गेल्या आर्थिक वर्षात राज्याचं सांकेतिक स्थूल उत्पन्न ४० लाख ४४ हजार २५१ कोटी रुपये अपेक्षित आहे. त्या आधीच्या आर्थिक वर्षात तुलनेत त्यात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात राज्याचा

सरासरी हिस्सा सर्वाधिक आहे, असं या अहवालात नमूद आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ८ दशांश टक्के, महसुली तूट अर्धा टक्के आणि कर्जाचे प्रमाण राज्याच्या उत्पन्नाच्या १७ पूर्णांक ६ दशांश टक्के आहे.

गेल्या आर्थिक वर्षात दरडोई राज्य उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल असा राज्य सरकारचा अंदाज आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत त्यात २५ हजार २१४ रुपयांची वाढ झाली. इतर राज्यांच्या तुलनेत दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात ६व्या स्थानी आहे.

गेल्या मान्सूनमध्ये राज्यात सरासरीच्या तुलनेत ८६ टक्क्यांहून अधिक पाऊस पडला. १९ तालुक्यांमध्ये अतिरीक्त तर १४६ तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. परकीय थेट गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र गेल्या आर्थिक वर्षातही पहिल्या स्थानी राहिला आहे.

**<><><><><>**

विधान परिषदेतही राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल सभागृहाच्या पटलावर मांडण्यात आला. प्रादेशिक नियोजन आणि नगर रचना तसंच महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासंबंधीचे अध्यादेश सरकारनं पटलावर मांडले. दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या महाराष्ट्र पोलीस सुधारणा विधेयक २०२४, मुंबई महानगरपालिका सुधारणा विधेयक २०२४, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ सुधारणा विधेयक २०२४, महाराष्ट्र सहकारी संस्था दुसरी सुधारणा विधेयक २०२४, महाराष्ट्र विनियोजन लेखानुदान विधेयक २०२४, महाराष्ट्र महानगरपालिका सुधारणा विधेयक २०२४ आणि महाराष्ट्र कामगार कल्याण निधी सुधारणा विधेयक २०२४ या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचं जाहीर करण्यात आलं. त्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी प्रसाद

लाड, विलास पोतनीस, अमोल मिटकरी, अभिजीत वंजारी आणि मनीषा कायंदे या सदस्यांची सभापती तालिकेवर नामनियुक्ती केली. राज्यभरात सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेसाठी आलेल्या उमेदवारांना योग्य सोयीसुविधा मिळत नसल्याचा मुद्दा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला. त्यावर, यासंदर्भात सर्व संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्याचं, बऱ्याच ठिकाणी आवश्यक ती व्यवस्था करण्यात आल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. यानंतर दिवंगत आजी माजी सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून विधान परिषदेचं कामकाज उद्या बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

भारतीय शेअर बाजारांमधे आज दिवसाच्या सुरुवातीलाच तेजीचं वातावरण दिसून आलं. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्सने आज पहिल्यांदाच ७९ हजार अंकांची पातळी ओलांडली, तर राष्ट्रीय बाजाराचा निफ्टी २३ हजार ८८१ अंकांच्या पुढे गेला. सुरुवातीला नफावसुलीमुळे शेअर बाजारात काही काळ निरुत्साह दिसत होता, पण त्यानंतर पुन्हा खरेदीला जोर आल्यामुळे शेअर बाजार विक्रमी अंकांवर पोहोचले.

**<><><><><>**

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज सकाळी झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानवर ९ गडी राखून विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. आयसीसी विश्वचषक स्पर्धेत अंतिम फेरीत जाण्याची दक्षिण आफ्रिकेची ही पहिलीच वेळ आहे. अफगाणिस्तानच्या ५७ धावांचं आव्हान दक्षिण आफ्रिकेने केवळ ९ षटकात पूर्ण केलं. तत्पूर्वी अफगाणिस्तानच्या फलंदाजीची सुरुवात अतिशय खराब झाली. एकामागोमाग एक खेळाडू गमावत बारा षटकं पूर्ण

होण्याआधीच अफगाणिस्तानचा संपूर्ण संघ ५६धावांवर गारद झाला. आयसीसी विश्वचषक स्पर्धेतल्या उपांत्य फेरीतली ही नीचांकी धावसंख्या आहे.

दरम्यान, स्पर्धेतला दुसरा उपांत्य सामना भारत आणि इंग्लंड यांच्यात आज रात्री आठ वाजता गयाना इथल्या प्रोव्हिडन्स स्टेडियमवर होणार आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी तत्काळ कर्जमुक्ती योजना जाहीर करुन निवडणुकीपूर्वी त्याची अंमलबजावणी करावी अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. मुंबईत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. राज्यातल्या शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर आहे. दररोज सरासरी ९ शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असल्याचा दावा त्यांनी केला. शेतकऱ्यांना द्यायची १० हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेची भरपाई प्रलंबित आहे, असंही ते म्हणाले.

मध्यप्रदेशच्या धर्तीवर राज्यातही मुलींसाठी आर्थिक मदत देण्याची योजना राबवण्याचा सरकारचा विचार आहे. पण केवळ मुलींना नव्हे तर मुलांनाही मदत द्यावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली.

**//<><><><><>//**